**नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०१७**

श्री. श्रीकांत मारुतराव पाटणकर वि. आझाद अन्सारी वगैरे.

**निशाणी ३५ खालील आदेश**

(**पारीत दिनांक – १३/१०/२०२१**)

प्रतिवादी क्रमांक ४ यांनी सदरचा दावा त्यांचे विरुद्ध चालण्यास पात्र नसलेबाबत प्राथमिक मुद्दा काढून तो मुद्दा निकाली काढणेकरिता दाखल केला आहे.

०२. वादीने त्यांचे म्हणणे (निशाणी. ४२) दाखल करुन सदरील अर्जास प्रखर आक्षेप घेतला आहे.

०३. वादीच्या सदरील अर्जाच्या अनुषंगाने मी संपुर्ण संचिकेची व त्यामध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरील दाव्यातील प्रतिवादी क्र.४ हे कराड येथील दुकान निरिक्षक या पदावर कार्यरत असल्यामुळे ते लोकसेवक आहेत . वादीने सदरील प्रतिवादीस दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० अन्वये नोटीस दिलेली नाही व त्यामुळे सदरचा दावा चालू शकत नाही, अशी मागणी अर्जात केलेली आहे.

०४. सदरील आक्षेपाच्या अनुषंगाने दाव्याच्या संचिकेची पाहणी केली असता, दावा दाखल करते वेळेस वादीने अर्ज (निशाणी ९) दाखल केलेला दिसून येतो. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ हे लोकसेवक असले कारणाने दावा दाखलपूर्व द्यावयाच्या नोटीसीचा कालावधी माफ होऊन मिळणेबाबत विनंती केली आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेनंतर प्रस्तुतचा दावा दाखल झालेला दिसून येतो. तसेच वादीने दाखल केलेले कागदपत्रांची (निशाणी ३) पाहणी केली

असता वादीने प्रतिवादी क्र . ४ यांना दावा दाखल करणेपूर्वी म्हणजेच दिनांक १०/०३/२०१७ रोजी दिलेल्या नोटीसीची प्रत (निशाणी ३/३) दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यास वादीने दावा दाखलपूर्व नोटीस दिली नाही. या कथनामध्ये तथ्य दिसून येत नाही.

०५. मूळ दावा अर्जातील वादीने मागणी केलेली २१ (ड) मधील विनंती ही निरंतर मनाईचा हुकूम होणेबाबत केल्याचे दिसून येते . सदरची दाद ही दोन्ही पक्षांचे तोंडी , कागदोपत्री पुरावा घेऊन गुणदोषांवर ठरविले जाणार आहे . त्याबाबतचा प्राथमिक मुद्दा काढण्याची आवश्यकता नाही कारण नोटीसीबाबतचा सदरील मुद्या हा दाव्याच्या इतर मुद्दयांसोबत विचाराधीन होऊ शकतो. तो मुद्दा प्राथमिक स्वरुपाचा होऊ शकत नाही , असे माझे मत झाले आहे.

०६. वादीने प्रतिवादी क्र . ४ हे लोकसेवक असले कारणाने दिनांक १०/०३/२०१७ रोजी दावा दाखलपूर्व नोटीस दिली असून नियमानुसार दावा दाखल करणेपूर्वी कायद्यानुसार द्यावयास लागणारा कालावधी माफ करुन मागितला होता . सदरचा कालावधी माफ झाल्यानंतरच प्रस्तुतचा दावा दाखल झाला असल्याचे स्पष्ट होते . अशारितीने प्रतिवादीने केलेली मागणी विनंतीमध्ये तथ्य नसल्याकारणाने सदरचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

दिनांक : १३/१०/२०२१ (सं.सा.वनकोरे)

कराड २ रे सहदिवाणी न्यायाधीश क स्तर,

कराड